पुढारी

# आयुक्तांसह कुलगुरूही स्वच्छता मोहिमेत



कोल्हापूर : १५ ऑगस्टनिमित्त महास्वच्छता मोहिमेत आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, शाहू महाराज, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे सहभागी झाले. या मोहिमेत सायबर कॉलेज, कमला कॉलेज, केएमसी कॉलेजच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी, किर्लोस्कर कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. यावेळी सुमारे ६० डंपर गाळ व कचरा काढण्यात आला. (छाया : तय्यब अली)

# पूरग्रस्त भागात स्वच्छता मोहीम

## शिवाजी विद्यापीठासह महाविद्यालये सरसावली; अनेक ठिकाणी मदत

महाराष्ट्र टाइम्स
**महापुरानंतर**



लक्ष्मीपुरी येथील गल्ल्यांमध्ये स्वच्छता मोहीम राबविताना शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

कोल्हापूर : शहर परिसरात महापुरामुळे झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्यावतीने शहरात स्वच्छता अभियानास प्रारंभ करण्यात आला. पुराचे पाणी घुसून नुकसान झालेल्या सुमारे तेरा महाविद्यालयांतील एनएसएसच्या टीमने ठिकठिकाणी स्वच्छता मोहीम राबवली.

गुरूवारी स्वातंत्र्यदिनाचे ध्वजवंदन झाल्यानंतर विद्यापीठासह शहरातील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे हजार स्वयंसेवकांनी शहरात स्वच्छता मोहीम राबवली. लक्ष्मीपुरी येथे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील यांच्यासह अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. अमोल मिणचेकर, एनएसएस शहर समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. सुरवातीला स्वयंसेवकांना हातमोजे, मास्क, गमबूट तसेच अन्य साहित्याचे वाटप करण्यात आले. रोटरी क्लबच्यावतीनेही स्वयंसेवकांना टोप्या व स्वच्छता साहित्य देण्यात आले. त्यानंतर मोहिमेस सुरवात करण्यात आली.

लक्ष्मीपुरीत रिलायन्स मॉलच्या परिसरातील विविध गल्ल्यांमध्ये पुराच्या पाण्यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. घरे, दुकानांसह रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात चिखल साचला आहे. राष्ट्रीय सेवा योजना तसेच विद्यापीठाच्या एमएसडब्ल्यूच्या स्वयंसेवकांनी हा सारा मलबा घरांतून, गल्ल्यांतून बाहेर काढून मुख्य रस्त्यापर्यंत आणला. तुंबलेली गटारे मोकळी करण्याबरोबरच अन्य स्वच्छतेची कामे केली. राजाराम कॉलेज, कमला कॉलेज आणि न्यू कॉलेजच्या एनएसएस स्वयंसेवक व छात्रसैनिकांच्या वतीने तसेच किर्लोस्कर ऑइल इंजिनच्या कर्मचाऱ्यांतर्फे शाहूपुरी कुंभार गल्ली (शाहूपुरी) परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

### सिद्धार्थनगरातील काव्यांजलीला शैक्षणिक साहित्य

सिद्धार्थनगर येथील काव्यांजली संजय कांबळे या बालिकेला दप्तर, पुस्तके पुराच्या पाण्यानं भिजून खराब झाल्याचे सांगताना रडू कोसळले. खरेतर काव्यांजलीचे घरच या पुराने पडले आहे. डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी तिला शैक्षणिक साहित्य देण्याचा निश्चय केला. तिच्यासारख्या सिद्धार्थनगरातील अन्य बालकांनाही त्यांनी शैक्षणिक साहित्य देण्याचे ठरविले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी परीक्षा संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, एनएसएस समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रसूल कोरबू यांच्या उपस्थितीत सिद्धार्थनगरातील समाज मंदिरात हे साहित्य वाटप करण्यात आले.



महावीर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, नगरसेवक अशोक जाधव, प्रा. उमेश वांगदरे आदी सहभागी झाले.

## महावीर महाविद्यालयात स्वच्छता अभियान

महावीर महाविद्यलयाने १५ ऑगस्टपासून स्वच्छतेची मोहरम हाती घेतली. महाविद्यालयाच्या मुख्य रस्त्यावरील कचरा संकलनाचे कामकाज पूर्ण केले. महाविद्यालयाच्या एन. सी. सी. व एन. एस. एस. विभागाच्या विद्यार्थ्यांनी सकाळी नऊपासून दुपारी दोनपर्यंत कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात संकलन करून ते महापालिकेच्या घनकचरा गाडीमध्ये जमा केले. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी भेट देत प्रत्यक्ष सहभाग घेवून त्यांना प्रोत्साहन दिले. या मोहिमेचे संयोजन एन. सी. सी. विभाग प्रमुख लेफ्टनंट उमेश वांगदरे व लेफ्टनंट डॉ. सुजाता पाटील तसेच एन. एस. एस. विभागप्रमुख डॉ. गोपाळ गावडे, व प्रा. रविदास पाडवी यांनी केले. मोहिमेत प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांनी सक्रीय सहभाग घेतला.

पुढारी

# शहर स्वच्छतेसाठी विद्यापीठ सरसावले

## स्वच्छता अभियानास प्रारंभ; एनएसएस, एनसीसीच्या हजारो स्वयंसेवकांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महापुरामुळे शहरात निर्माण झालेली अस्वच्छता दूर करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू, अधिकारी, कर्मचारी, एनएसएस, एनसीसीचे विद्यार्थी सरसावले आहेत. स्वातंत्र्य दिनापासून शहरात स्वच्छता अभियानास प्रारंभ करण्यात आला आहे. १३ महाविद्यालयांच्या चमूने ठिकठिकाणी स्वच्छता मोहीम राबविली.

विद्यापीठासह शहरातील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे १ हजार स्वयंसेवकांनी शहरात स्वच्छता मोहीम राबविली. लक्ष्मीपुरी येथे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्यासह अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. अमोल मिणचेकर, एनएसएस शहर समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहिमेस औपचारिक प्रारंभ करण्यात आला.

लक्ष्मीपुरी येथे रिलायन्स मॉलच्या परिसरातील विविध गल्ल्यांमध्ये पुराच्या पाण्यामुळे प्रचंड नुकसान झाले. राष्ट्रीय सेवा योजना, विद्यापीठाच्या एमएसडब्ल्यूच्या स्वयंसेवकांनी घरांतून, गल्ल्यांतून कचरा, मलबा बाहेर काढून मुख्य रस्त्यापर्यंत आणण्यात आला. तुंबलेली गटारे मोकळी करण्याबरोबरच अन्य स्वच्छतेची कामे केली. राजाराम कॉलेज, कमला कॉलेज व न्यू कॉलेजच्या एनएसएस स्वयंसेवक, छात्रसैनिक, किर्लोस्कर ऑईल इंजिनच्या कर्मचारी यांनी कुंभार गल्ली (शाहूपुरी) परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. कुलगुरू, प्र-कुलगुरू यांच्यासह आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. व्ही. एम. चव्हाण यांनीही स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी भेट देऊन स्वच्छता मोहिमेची पाहणी केली.



**कोल्हापूर : लक्ष्मीपुरी येथील गल्ल्यांमध्ये स्वच्छता मोहीम राबविताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक. (छाया : नाज ट्रेनर)**

### सिद्धार्थनगरातील काव्यांजलीला शैक्षणिक साहित्य

सिद्धार्थनगर येथील काव्यांजली संजय कांबळे हिचे घरच पुराने पडले. पुरामध्ये दप्तर, पुस्तके पुराच्या पाण्याने भिजून खराब झाल्याचे प्रसार माध्यम प्रतिनिधीस सांगताना रडू कोसळले. सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी तिला शैक्षणिक साहित्य देण्याचे ठरविले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सिद्धार्थनगरातील समाज मंदिरात साहित्य वाटप करण्यात आले. कुलगुरूंसह विद्यापीठाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सिद्धार्थनगर परिसरात फिरून पुरामुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतली व आपत्तीग्रस्त नागरिकांचे सांत्वन केले.




# विद्यापीठाने केला पाणीपुरवठा

**महापूरकाळात नागरिकांची केली सोय**

कोल्हापूर टाइम्स टीम

शहरातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचे सावट ओळखून गेल्या चार दिवसांत पूरपरिस्थितीच्या काळात शिवाजी विद्यापीठाच्या जलशुद्धीकरण केंद्रामधून सुमारे दहा लाख लीटरहून अधिक पाणी शहरवासीयांना उपलब्ध करून देण्यात आले, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कोल्हापूर जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी आणि महापुरामुळे शहराला पाणीपुरवठा करणारी महानगरपालिकेची जल शुद्धीकरण यंत्रणा पाण्याखाली गेल्याने नादुरुस्त झाली आहे. त्यामुळे सभोवती पुराचे पाणीच पाणी असूनही नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. शहरातील ही परिस्थिती लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने गेल्या चार दिवसांपासून महानगरपालिका प्रशासनाच्या सहकार्याने आपल्या जलशुद्धीकरण केंद्रातील पाणी महापालिकेच्या टँकरसह त्यांनी भाड्याने घेतलेल्या टँकरमधून शहराला पाणीपुरवठा करण्यास सुरवात केली आहे. यामुळे शहरवासीयांना मोठा दिलासा मिळाला. विद्यापीठाने गेल्या चार वर्षांत 'जलयुक्त विद्यापीठ' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने




सातत्याने प्रयत्न केले आहेत. तीन मोठे जलाशय, आठ विहीरी, सहा शेततळी आदींच्या माध्यमातून सुमारे ४० कोटी लीटरची साठवण क्षमता निर्माण करण्यात यशस्वी झालेले शिवाजी विद्यापीठ गेल्या दोन वर्षांत पाण्याच्या संदर्भात पूर्णतः स्वयंपूर्ण झाले आहे. यंदा विद्यापीठाने महापूर स्थितीत पाणीटंचाईग्रस्त असलेल्या शहराला दिवसाला सरासरी दोन ते अडीच लाख लीटर पाणी पुरविले.

**चारा छावणीसाठीही मदत**

विद्यापीठाने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासही विद्यापीठाने मोठा हातभार आहे.पूरग्रस्त भागातील जनावरांचा चारा-वैरणीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ही बाब लक्षात घेऊन गेल्या चार दिवसांत सुमारे चाळीस ट्रॉली चारा विद्यापीठाच्या कॅम्पसमधून आपत्तीग्रस्त भागातील जनावरांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे आपत्तीग्रस्तांना जीवनावश्यक वस्तू, वैद्यकीय सुविधा पुरविण्याच्या दृष्टीनेही विद्यापीठ आपल्या शिव सहायता-आपत्ती निवारण कक्षाच्या माध्यमातून प्रयत्नशील असल्याचेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# विद्यापीठातर्फे शहरात स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

महापुरामुळे झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातर्फे गुरुवारपासून शहरात स्वच्छता अभियानास सुरुवात करण्यात आली. दिवसभरात पुराचे पाणी घुसून नुकसान झालेल्या सुमारे तेरा महाविद्यालयांच्या चमूने ठिकठिकाणी स्वच्छता मोहीम राबवली. ध्वजवंदन झाल्यानंतर शिवाजी विद्यापीठासह शहरातील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे एक हजार स्वयंसेवकांनी शहरात स्वच्छता मोहीम राबवली. लक्ष्मीपुरी येथे रिलायन्स मॉलच्या परिसरातील विविध गल्ल्यांमध्ये पुराच्या पाण्यामुळे प्रचंड नुकसान झाले. घरे, दुकानांसह रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात चिखलाचे थर साचले आहेत. राष्ट्रीय सेवा योजना तसेच विद्यापीठाच्या एमएसडब्ल्यूच्या स्वयंसेवकांनी हा सारा मलबा घरांतून, गल्ल्यांतून बाहेर काढून मुख्य रस्त्यापर्यंत आणला. तुंबलेली गटारे मोकळी करण्याबरोबरच अन्य स्वच्छतेची कामे करण्यात आली. राजाराम कॉलेज, कमला कॉलेज व न्यू कॉलेजच्या एनएसएस



कोल्हापूर : कुंभार गल्ली येथे स्वच्छा मोहिमेंतर्गत सफाई करताना कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

स्वयंसेवकांच्या व छात्रसैनिकांच्या वतीने तसेच किर्लोस्कर ऑईल इंजिनच्या कर्मचाऱ्यांतर्फे कुंभार गल्ली (शाहूपुरी) परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या ठिकाणी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. व्ही. एम. चव्हाण यांनीही स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. यावेळी जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनीही भेट दिली.

हुतात्मा बाग परिसर (गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज), दसरा चौक परिसर (श्री शहाजी छत्रपती कॉलेज), न्यू पॅलेस परिसर (महावीर कॉलेज), सिद्धार्थनगर परिसर (नाईट कॉलेज व डी. आर. के. वाणिज्य कॉलेज), दुधाळी व पंचगंगा घाट परिसर (यशवंतराव चव्हाण कॉलेज), शुक्रवार पेठ परिसर (डी. डी. शिंदे कॉलेज), रमणमळा परिसर (विवेकानंद कॉलेज), बावडा परिसर (डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज), कदमवाडी परिसर (राजर्षी शाहू कॉलेज) या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यापुढील काळातही या परिसरात संबंधित महाविद्यालयांतर्फे जिल्ह्यातील विविध पूरग्रस्त गावांत स्वच्छता मोहीम सुरू राहणार आहे.

**काव्यांजलीला शैक्षणिक साहित्य**

दूरचित्रवाणी वाहिनीशी बोलताना सिद्धार्थनगर येथील काव्यांजली संजय कांबळे या बालिकेला आपले दप्तर, पुस्तक पुराच्या पाण्यात भिजून खराब झाल्याचे सांगताना रडू कोसळले. खरे तर काव्यांजलीचे घरच या पुराने पडले आहे. पण, तिची तगमग मात्र पुस्तकांसाठी होती. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी तिला शैक्षणिक साहित्य देण्याचा निचय केला. तिच्यासारख्या सिद्धार्थनगरातील अन्य बालकांनाही त्यांनी शैक्षणिक साहित्य देण्याचे ठरवले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिमदे यांच्या हस्ते सिद्धार्थनगरातील समाजमंदिरात हे साहित्य वाटप करण्यात आले.

# स्वच्छतेला महाविद्यालयीन युवकांचा हातभार

## शिवाजी विद्यापीठातर्फे शहरात मोहीम : १३ महाविद्यालयांतील स्वयंसेवकांचा सहभाग

**आर. के. नगर, ता. १६ : शहर परिसरात महापुरामुळे झालेल्या नुकसानीच्या पाश्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आजपासून शहरात स्वच्छता अभियानास प्रारंभ करण्यात आला. दिवसभरात सुमारे १३ महाविद्यालयांच्या चमूने ठिकठिकाणी स्वच्छता मोहीम राबविली.**

विद्यापीठासह शहरातील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे एक हजार स्वयंसेवकांनी शहरात स्वच्छता मोहीम राबविली. लक्ष्मीपुरी येथे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील यांच्यासह अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, डॉ. ए.एम. गुरव, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. अमोल मिणचेकर, एनएसएस शहर समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहिमेस औपचारिक प्रारंभ करण्यात आला. सुरवातीला स्वयंसेवकांना हातमोजे, मास्क, गमबूट तसेच अन्य स्वच्छता साहित्याचे वाटप करण्यात आले. रोटरी क्लबच्या वतीनेही स्वयंसेवकांना टोप्या व स्वच्छता साहित्य देण्यात आले.

लक्ष्मीपुरी येथे रिलायन्स मॉलच्या परिसरातील विविध गल्ल्यांमध्ये पुराच्या पाण्यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. घरे, दुकानांसह रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात चिखलाचे थर साचले आहेत. राष्ट्रीय सेवा योजना तसेच विद्यापीठाच्या एमएसडब्ल्यूच्या स्वयंसेवकांनी हा सारा मलबा घरांतून, गल्ल्यांतून बाहेर काढून मुख्य रस्त्यापर्यंत आणण्यात आला. तुंबलेली गटारे मोकळी करण्याबरोबरच अन्य स्वच्छतेची कामे करण्यात आली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शहर परिसरात स्वच्छता करताना एनएसएसचे स्वयंसेवक.

राजाराम कॉलेज, कमला कॉलेज व न्यू कॉलेजच्या एनएसएस स्वयंसेवकांच्या व छात्रसैनिकांच्या वतीने तसेच किर्लोस्कर ऑईल इंजिनच्या कर्मचाऱ्यांतर्फे कुंभार गल्ली (शाहूपुरी) परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. आयुक्त मल्लीनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. व्ही.एम. चव्हाण यांनीही स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. या वेळी जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनीही भेट देऊन सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेची पाहणी केली व मोहिमेत सहभागी स्वयंसेवकांचे अभिनंदन केले.

स्वयंसेवकांनी हुतात्मा बाग परिसर (गोपाळकृष्ण गोखले कॉलेज), दसरा चौक परिसर (श्री शहाजी छत्रपती कॉलेज), न्यू पॅलेस परिसर (महावीर कॉलेज), सिद्धार्थनगर परिसर (नाईट कॉलेज व डी.आर.के. वाणिज्य कॉलेज), दुधाळी व पंचगंगा घाट परिसर (यशवंतराव चव्हाण कॉलेज), शुक्रवार पेठ परिसर (डी. डी. शिंदे कॉलेज), रमणमळा परिसर (विवेकानंद कॉलेज), बावडा परिसर (डॉ. डी.वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज), कदमवाडी परिसरात (राजर्षी शाहू कॉलेज) स्वच्छता केली.

### साहित्य वाटप..

सिद्धार्थनगर येथील काव्यांजली संजय कांबळे हिच्यासह अन्य बालकांना विद्यापीठातर्फे सिद्धार्थनगरातील समाज मंदिरात हे साहित्य वाटप करण्यात आले. काव्यांजलीला डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी शैक्षणिक साहित्य देण्याचा निश्चय केला.





कोल्हापूर शहरात महापुरामुळे रस्त्यावर साचलेला गाळ पाण्याचे फवारे मारून काढण्यात येत आहे. दुसऱ्या छायाचित्रात महापूर आलेल्या भागात युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून, सुमारे ७०० कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत भाग घेतला आहे. तिसऱ्या छायाचित्रात कोल्हापुरातील कुंभार गल्ली येथे स्वच्छता मोहिमेअंतर्गत गुरुवारी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी साफसफाई केली.

## स्वच्छता मोहीम : महापालिका कर्मचाऱ्यांसह, शिवाजी विद्यापीठ, जिल्हा बँक कर्मचाऱ्यांनी लावला हातभार

# पूरग्रस्त भागातील ८५ डंपर कचरा उठाव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शहरातील महापुराचे पाणी ओसरलेल्या भागात महानगरपालिकेचे कर्मचारी स्वच्छता मोहिमेचे काम झपाटून करत आहेत. रोज आठ तास चालणारे शहर स्वच्छतेचे काम सध्याच्या महापुराच्या पार्श्वभूमीवर रोज १२ तास काम केले जात आहे. दरम्यान, शुक्रवारी ८५ डंपर कचरा, प्लास्टिक तसेच साचलेला गाळ उचलण्यात आला. रस्ते पाण्याने धुण्याचीही मोहीमदेखील सुरुच आहे.

महानगरपालिकेच्या वतीने महापूर आलेल्या भागात शुक्रवारी सातव्या दिवशीही स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर हाती घेण्यात आली. या मोहिमेत दुधाळी, पंचगंगा तालीमरोड, लक्ष्मीपुरी, शाहूपुरी, व्हीनस कॉर्नर, दसरा चौक, मुक्तसैनिक वसाहत, न्यू पॅलेस, रमणमळा व जाधववाडी परिसराची स्वच्छता करून ८५ डंपर कचरा, प्लास्टिक व गाळ उठाव करण्यात आला. महानगरपालिकेचे सुमारे ७०० कर्मचारी या मोहिमेत अक्षरश: झपाटल्यासारखे भाग घेऊन शहर स्वच्छ करण्याचा प्रयत्न करत आहेत.

स्वच्छता केल्यानंतर रोगराई पसरू नये म्हणून लागलीच धूर व औषध फवारणी, ब्लीचिंग पावडर टाकली जात आहे. गाळ उठाव करण्यासाठी १७ जेसीबी, २० डंपर, जेट मशीन सहा अशा मशिनरी उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

यामध्ये महापालिकेचे सहा जे.सी.बी., देवस्थान समितीचे चार जेसीबी, आमदार राजेश क्षीरसागर यांचा एक जेसीबी, डी. वाय. पाटील ग्रुप दोन जेसीबी, व्ही. बी. पाटील यांचा एक जेसीबी, प्रदीप पाटील यांचे दोन जेसीबी, रुकडीकर यांच्या एका जेसीबीचा समावेश आहे. आमदार सतेज पाटील यांनी लोडर दोन दिला असून, स्वच्छतेसाठी महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसह के. एम. सी. कॉलेज, स्वरा फौंडेशन आणि किर्लोस्कर कंपनीचे एकूण २०० कर्मचारी, देवस्थान समितीचे ५० सफाई कर्मचारी, रत्नागिरी नगरपालिकेचे १५ कर्मचारी, मुंबई महानगरपालिकेचे ८० कर्मचारी, बीव्हीजी कंपनीचे ८५ सफाई कर्मचारी यांचा समावेश आहे.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविली जात आहे.

## कचऱ्यातील ६ तोळ्यांचे सोन्याचे कडे परत

### जिल्हा बँक कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा : पूरबाधित भागात स्वच्छता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शहरातील पूरबाधित भागाची स्वच्छता गुरुवारी (दि. १५) जिल्हा बँकेच्या कर्मचाऱ्यांनी केली. यावेळी महावीर कॉलेज येथील एका फ्लॅटमधून खराब झालेले साहित्य बाहेर टाकले जात असताना बँकेचे कर्मचारी संजय साबळे यांना सहा तोळे वजनाचे सोन्याचे कडे सापडले. त्यांनी संबधितांना प्रामाणिकपणे परत केले.



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्यांनी कोल्हापूर शहरातील पूरबाधित भागात स्वच्छता मोहीम राबवली.

महापुराचे पाणी ओसरल्यानंतर पूरबाधित भागात स्वच्छता मोहीम मोठ्या प्रमाणात राबवली जात आहे. प्रत्येकजण आपापल्या परीने पूरग्रस्तांना मदतीचा हात पुढे करत आहे. स्वच्छता मोहिमेत जिल्हा बँकेच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. गुरुवारी सकाळी ध्वजवंदन झाल्यानंतर मुख्य कार्यालय, शाहूपुरी, राजारामपुरी, लक्ष्मीपुरी, शिवाजी पेठ, कसबा बावडा, मार्केट यार्ड, बिंदू चौक, साने गुरुजी महिला शाखा, जिल्हा परिषद व फुलेवाडी या शाखांतील कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. कोल्हापूर डिझास्टर मॅनेजमेंट ग्रुपने ठरवून दिल्यानुसार शाहूपुरी कुंभार गल्ली, महावीर कॉलेज परिसर, डायमंड हॉस्पिटल परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. शाहूपुरी कुंभार गल्ली येथे स्वच्छता मोहीम सुरु असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, छत्रपती शाहू, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष, आमदार हसन मुश्रीफ, ए. वाय. पाटील, आर. के. पोवार, महापालिकेचे आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी यांनी भेट दिली. स्वच्छता मोहिमेत बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ए. बी. माने यांच्यापासून शिपायापर्यंत कर्मचारी सहभागी झाले होते.

**गल्ली-बोळात शिरुन स्वच्छता**

कर्मचाऱ्यांनी गल्ली-बोळात शिरुन घरे व फ्लॅटमधील स्वच्छता केली. खराब, कुजलेले साहित्य बाहेर काढून त्याची विल्हेवाट लावण्याचे कामही त्यांनी केले.

## विद्यापीठाकडून स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर :** महापुरामुळे शहर परिसरात झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने गुरुवारी (दि. १५) शहरात स्वच्छता अभियानास प्रारंभ केला.

१३ महाविद्यालयांच्या चमूने ही स्वच्छता मोहीम राबविली. यात विद्यापीठासह शहरातील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) सुमारे एक हजार स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. लक्ष्मीपुरी येथे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, गजानन पळसे,व्ही. टी. पाटील, पी. डी. राऊत, ए. एम. गुरव, आर. व्ही. गुरव, डी. के. गायकवाड, प्रल्हाद माने, अमोल मिणचेकर, शिवाजी जाधव यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहीम सुरु झाली. लक्ष्मीपुरी येथे रिलायन्स मॉल परिसरातील विविध गल्ल्यांमध्ये घरे, दुकानांसह रस्त्यांवर चिखलाचे थर साचले आहेत. तेथे एनएसएस, एमएसडब्ल्यूच्या स्वयंसेवकांनी स्वच्छता मोहीम राबविली. राजाराम कॉलेज, कमला कॉलेज, न्यू कॉलेजचे एनएसएस स्वयंसेवक, छात्रसैनिक आणि किर्लोस्कर ऑईल इंजिनच्या कर्मचाऱ्यांतर्फे कुंभार गल्ली (शाहूपुरी) परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. त्यात आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. व्ही. एम. चव्हाण यांनी सहभाग घेतला. सिद्धार्थनगर येथील काव्यांजली कांबळे हिच्यासह अन्य मुला-मुलींना डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी शैक्षणिक साहित्य देण्याचे ठरविले. त्यानुसार कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते साहित्य वाटप केले.

### येथे राबविली मोहीम

हुतात्मा बाग परिसर (गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज), दसरा चौक (श्री शहाजी छत्रपती कॉलेज), न्यू पॅलेस परिसर (महावीर कॉलेज), सिद्धार्थनगर (नाईट कॉलेज व डी. आर. के. वाणिज्य कॉलेज), दुधाळी व पंचगंगा घाट परिसर (यशवंतराव चव्हाण कॉलेज), शुक्रवार पेठ (डी. डी. शिंदे कॉलेज), रमणमळा (विवेकानंद कॉलेज), कसबा बावडा परिसर (डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज), कदमवाडी (राजर्षी शाहू कॉलेज) येथे गुरुवारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

## शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिन

शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिनानिमित्त गुरुवारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, पी. डी. राऊत, ए. एम. गुरव, भारती पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डी. के. गायकवाड, क्रीडा विभागप्रमुख पी. टी. गायकवाड, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## कुलगुरूंकडून पाहणी

कोल्हापूर : कोल्हापूर शहरातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय आणि महावीर महाविद्यालय या दोन ठिकाणी महापुराचे पाणी शिरल्याने झालेल्या नुकसानीची शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड होते. दसरा चौक येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय आणि महावीर महाविद्यालयाच्या परिसरात महापुराचे पाणी शिरले होते.

# महाविद्यालयीन शिक्षकांच्या स्थान निश्चितीबाबत मंगळवारपासून मुलाखती

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन शिक्षकांची सहाव्या वेतन आयोगानुसार सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदी (स्टेज ४ व ५) स्थाननिश्चितीसाठी विद्यापीठामार्फत केंद्रीय पद्धतीने २० ऑगस्ट ते १९ सप्टेंबर या कालावधीत 'कॅस'अंतर्गत मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या शिक्षकांनी सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक (स्टेज ४ व ५) स्थाननिश्चिती करण्यासाठी प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्यांना कामकाजाच्या सोयीसाठी व स्थाननिश्चिती निवड समितीसमोर विषयानुसार प्रेझेंटेशन सादर करण्यासाठी व प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे विद्यापीठाच्या संलग्नता विभागाचे उपकुलसचिव एम. पी. कदम यांनी कळविले आहे.

# शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी स्वातंत्र्यदिनानिमित्त कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्यासह अधिष्ठाता पी. एस. पाटील, पी. डी. राऊत, ए. एम. गुरव, भारती पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक आर. के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डी. के. गायकवाड, क्रीडा विभागप्रमुख पी. टी. गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत आदी उपस्थित होते.

# कॅसअंतर्गत मंगळवारपासून मुलाखती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन शिक्षकांची सहाव्या वेतन आयोगानुसार सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापकपदी (स्टेज ४ व ५) स्थाननिश्चिती करण्यासाठी विद्यापीठातर्फे केंद्रीय पद्धतीने २० ऑगस्ट ते १९ सप्टेंबर दरम्यान कॅस अंतर्गत मुलाखतीचे आयोजन केले आहे. त्याची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ज्या शिक्षकांनी सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक (स्टेज ४ व ५) स्थाननिश्चिती करण्यासाठी प्रस्ताव सादर केले आहेत, त्यांनी कामकाजाच्या सोयीसाठी व स्थाननिश्चिती निवड समितीसमोर विषयानुसार प्रेझेंटेशन सादर करण्यासाठी व प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाच्या संलग्नता विभागाचे उपकुलसचिव एम. पी. कदम यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2019
तरुण भारत

# शिक्षकांच्या स्थाननिश्चितीसाठी सोमवारपासून मुलाखती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन शिक्षकांची सहाव्या वेतन आयोगानुसार सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदी स्थाननिश्चिती करण्यासाठी विद्यापीठामार्फत केंद्रीय पध्दतीने दि. २० ऑगस्ट ते १९ सप्टेंबर या कालावधीमध्ये कॅस अंतर्गत मुलाखतीचे आयोजन केले आहे. याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ज्या शिक्षकांनी सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक (स्टेज ४ व ५) स्थाननिश्चिती करण्यासाठी प्रस्ताव सादर केले आहेत. त्यांना कामकाजाच्या सोयीसाठी व स्थाननिश्चिती निवड समितीसमोर विषयानुसार प्रेजेंटेशन सादर करण्यासाठी व प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाच्या संल ता विभागाचे उपकुलसचिव एम.पी.कदम यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2019
तरुण भारत

# परीक्षा अर्ज भरण्यास ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** महापुराच्या पाण्यात संपूर्ण जिल्हा बुडाल्याने शाळा, महाविद्यालये तब्बल आठ दिवस बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते. विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरणे शक्य झाले नाही. त्यामुळे नियमित शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्यास ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या परीक्षांचे अर्ज भरण्यासाठी २२ ऑगस्टपर्यंत मुदत होती. महापुरामुळे दळण-वळण व्यवस्थाच बंद असल्याने विद्यार्थी परीक्षा अर्ज भरू शकले नाहीत. विद्यार्थी हित लक्षात घेवून या बैठकीत परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच ज्या महाविद्यालयांना संगणकाअभावी परीक्षा अर्ज भरता येत नाहीत, अशा महाविद्यालय व विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठातील विविध अधिविभागातील संगणक उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये विद्यापीठातील संगणक विभाग, इंटरनेट विभागाचा समावेश आहे. या बैठकीला कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.
(छाया : तय्यब अली)

**शिवाजी विद्यापीठ** - शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिनानिमित्त कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. भारती पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ध्वजवंदन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन झाले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. भारती पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. आर.के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत आदी उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाकडून स्वच्छता मोहीम...



कोल्हापूर शहर परिसरात महापुरामुळे झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने स्वच्छता अभियानास प्रारंभ करण्यात आला. लक्ष्मीपुरी येथील गल्ल्यांमध्ये एनएसएसच्या स्वयंसेवकांनी साफसफाई केली. -वृत्त/२ व हॅलो १

पुण्य नगरी



शहरात विविध ठिकाणी झालेला चिखल बाजूला काढून रस्ते साफ करताना कुलगुरू देवानंद शिंदे, आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी व अन्य.